# ग्रामीण विकास एक मूल्यमापनात्मक अभ्यास

**प्रविण अर्जुन जाधव**
*संशोधक*
*अर्थशास्त्र विभाग,*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,*
*औरंगाबाद.*

**प्रस्तावना :**
भारताच्या संदर्भात ग्रामीण समाजशास्त्र महत्त्वो समजले जाते. कारण आपली बहुतांश लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असल्याने तीला वेगळया वैशिष्टयाने ओळख निर्माण झाली आहे. जगात भारत हा खेड्यांचा देश आहे. अशी आजही ओळख निर्माण झाली आहे. निसर्गाचे सानिध्य टिकून असलेल्या किंवा नैसर्गिक साधनसंपत्तीचे समृद्ध असूनही भारतीय जनतेचे समृद्ध देशातील लोक गरीब लोक म्हणून वर्णन करतात. त्यामुळे विकसित भारताचा मूलभूत आधार ग्रामीण विकास ठरतो. ग्रामीण भागातील जनतेचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याने त्यांचे जीवन चक्र त्यांच्याशी बांधले गेले आहे. परंतू शेती विकास म्हणजे ग्रामीण विकास एवढा मर्यादित अर्थ विकासाचा होत नाही. तर ग्रामीण जनतेचा सर्वांगीन विकास म्हणजे ग्रामीण विकास होय. एका अर्थाने हा ग्रामीण समाप्त बराचसा स्थितीशील वृत्तीचा असल्याने आपल्या जागीच राहून विविध अडचणीस संघर्ष करणे हा या समाजाचा स्वभाव होता.[१]

एखाद्या क्षेत्राचा विकास होण्यासाठी तो कशासाठी व्हावा याची प्रेरणा निर्माण झाल्यास तो विकास निश्चितच होतो. शिवाय तो बाह्य प्रेरणेने न होता स्वप्रेरणेतून झाल्यास निश्चितपणे ग्रामीण क्षेत्राचा आपण विकास केला आहे. किंवा काय बदल झाला हेही महत्त्वाचे ठरते. तसेच जोपर्यंत ग्रामीण लोकांनी त्यांची कर्तव्याची जाणीव होत नाही. तोपर्यंत ग्रामीण विकास होणे शक्य नाही. या संदर्भात सरकार आणि पंचायत राज संस्थाच नव्हे तर अशासकीय संघटनाही महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. ग्रामीण नेतृत्व हे ग्राम परिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. अशा नेतृत्वाला जनतेने पाठिंबा दिला एक परिवर्तन घडून येईल. त्याचप्रमाणे खेडे या छोट्या घटकाच्या विकासापुढे पक्षीय अभिनिवेश गौण ठरतात. म्हणून त्यांनी ग्रामीण कल्याणाला सर्वोच्च प्राथमिकता देणे हितकारक ठरते आणि आतून खेडे या शब्दाचा आदर होऊन विकास घेण्यास सहज यश निर्माण होते.[२]

**अध्ययनाची उद्दिष्ट्ये:**

१. ग्रामीण विकासाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या समस्या अभ्यासणे.
३. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील शासनाची भूमिका अभ्यासणे.

**अध्यायनाची गृहीतके:**

१. ग्रामीण विकासाची संकल्पना ही पुरातन आहे.
२. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा शेती क्षेत्राला प्रथम प्राधान्य देण्यात येते.
३. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये शासनाची भूमिका महत्त्वाची आहे.

**अध्ययनाची संशोधन पद्धती :**
प्रस्तूत अध्ययन संशोधनासाठी तथ्य संकलनासाठी द्वितीय साधनांमध्ये ग्रामीण विकासावर आधारित विविध संदभ्र ग्रंथ, मासिकामध्ये मधील लेख वर्तमानपत्रातील लेख, बातम्या, विविध प्रसारमाध्यम कडून मिळालेली माहितेचा आधार घेण्यात आला आहे.

**ग्रामीण विकासाची संकल्पना:**
स्थूलमानाने विचार करता ग्रामीण म्हणजे खेड्यांचा किंवा तेथिल नैसर्गिक व मानवी संसाधनांचा विकास तेथिल लोकांच्या जीवनमानात क्रमश ः सुधारणा घडवून आणणे. भावी काळात त्यांना अधिक चांगल्या, वाढविण्याच्या हेतूने सद्य स्थितीत संख्यात्मक व गुणात्मक बदल घडवून आणण्याची प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास असे म्हणता येईल. यावरून ग्रामीण विकास म्हणजे खेड्यातील किंवा ग्रामीण क्षेत्रातील विविध घटकांत अपेक्षित संख्यात्मक व गुणात्मक बदल घडवून आणणे होय.

दैनंदिन जीवनात ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीणा लोकांनी त्यांच्या कामकाजाच्या तसेच जीवन जगण्याच्या सवयीत अंशत अनुकूल बदल घडवून आणणे असा अर्थ आहे. यात ग्रामीण भागात नविन तंत्राचा प्रसार करणे, व्याख्यान देणे. विकासाविषयक माहितीवर दाखविणे इत्यादीवर भर देऊन ग्रामीण लोकांच्या जीवनमानात बदल अपेक्षित आहे. ग्रामीण दैनंदिन जीवनात लोकांनी त्यांची जीवन जगण्याची व काम करण्याची पद्धत बदलणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या समस्या :**

**शेतीप्रधान अर्थव्यवस्था:**
पूर्वीपासून ग्रामीण समाज जीवन शेतीभोवती फिरणारे आहे. म्हणजे या रचनेत शेती हा केंद्रिय व्यवसाय असून त्याभोवती आनुवंशिक व्यवसाय विकसित होतात. पहिल्या पंचवार्षीक योजनेपासूनच कृषी आधारित क्षेत्रावर धोरणात्मक विकास आणि स्त्रोतांच्या वितरणात प्रामुख्याने लक्ष केंद्रित करण्यात आले.

**ग्रामीण सुविधांचा कमी विकास :**
ग्रामीण अर्थव्यवस्थेत विकासासाठी पायाभूत संरचना सर्वात महत्त्वाचा वाया असतो. क्षेत्र कोणतेही असो, त्याच्या विकासासाठी पायाभूत सुविधा अनिवार्य असतात. भारताने विकासाची सुरूवात करतांना पोलाद रेल्वे, विद्यूत यासारख्या मूलभूत व अवजड उद्योगांना प्राधान्य दिले होते. म्हणून १९८० नंतर आपल्या विकासाला गती प्राप्त झाली. ग्रामीण भागामध्ये मात्र अत्यावश्यक सुविधा पुरेशा नाहीत. त्या म्हणजे रस्ते वाहतूक व दळववळणाच्या सोची, सिंचनाच्या सोयी विद्यूतीकरण, विपणनच्या सोयी, भांडवल पुरविणाऱ्या सस्थांची वाढ वगैर सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतीसाठी तसेच इतर छोट्या उद्योगांच्या विकासासाठी विद्यूतची सोय असायला हवी.

**राहणीमानाची कमी पातळी :**
ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधीची कमतरता शेतीची अवस्था, त्यातून निर्माण होणारी बेकारी आणि दारिद्रय यामुळे राहणीमानाची पातळीही कमी दिसून येते. वस्तूत लाखो ग्रामीण लोक ज्यास्थितीत जगत आहोत ती पाहता, राहणीमान हा शब्दप्रयोगही एक प्रकारे क्रुर चेष्टा केल्यासारखा वाटतो. जेव्हा आपण राहणीमानाचा विचार करतो तेव्हा मनुष्याच्या मूलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य) पूर्ण झाल्याचे गृहित धरून पूढचा विचार करतो. या भागात अशा अत्यावश्यक गरजाच अपूर्ण आहेत. नियोजन आयोगाने अलीकडेच स्पष्ट केलेली दारिद्रय रेषा जरी विचारात घेतली तरी ग्रामीण भागात किमान २८.३ व्यक्ती या रेषेखाली आहेत.

**अप्रशिक्षित मनुष्यबळ :**
अर्थशास्त्राच्या दृष्टीने श्रम हे उत्पादनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. या श्रमाची कार्यक्षमता ज्या घटकांवर अवलंबून असते. त्यापैकी एक घटक

म्हणजे श्रमाच्या हाती असणारे भांडवल (अवजारे व यंत्रसामुगी) हा आहे. त्यांच्या मदतीने श्रमाचे कार्य अधिक कार्यक्षमतेने होते. परंतू त्यासाठी श्रमिकांना प्रशिक्षण असायला हवे. भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे हे एक वैशिष्टये आहे की येथे मनुष्यबळ उपलब्ध आहे. परंतू ते प्रशिक्षित नसल्यामूळे त्याची खरी कार्यक्षमता उपयोगात येत नाही. शेतीच्या बाबतीत तर असे समजले जाते की त्या व्यवसायासाठी अनूभव पुरेसा असतो. वस्तूत शेतीचे ही शास्त्र आहे. व त्याची तत्वे आणि तंत्र ज्ञात असल्याने शेती अधिक लाभदाची ठरू शकतो. ग्रामीण भागात व्यवसाय आणि छोटे उद्योग चालवयाचे असतील तरी निदान अर्थकुशल मनुष्यबळ लागेल. त्यादृष्टीने पुरेशी सोयी विकसित झालेल्या नाहित तसेच याबद्दल पुरेशी जागरूकता निर्माण झालेली नाहीत.

**दारिद्रयाचे दृष्टचक्र :**

समाजातील बराचसा मोठा गट सातत्याने केवळ निर्वाह पातळीवरील किंवा त्याखालील पातळीवरील जीवन जगत असतो. त्यावेळी समाज व्यापक दारिद्रयाचे पछाडलेला आहे. असे म्हणता येईल भारतासारख्या देशात व्यापक दारिद्रय दृष्टीस पडते. शहरातील निरनिराळ्या भागात किंवा रस्त्यांच्या फरसबंदीवर झपाट्याने वाढलेल्या झोपडपट्टीतील लोकांची स्थिती पाहता भारतात व्यापक दारिद्रय आढळून येते. आजही ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी वैद्यकीय मदत, शिक्षण करमणूक या गोष्टी तर बाजूलाच आहे. पण किमान आवश्यक अन्न, पिण्याचे पाणी, निवारा, कवडालत्ता, आरोग्यसेवा इत्यादी किमान आवश्यक गरजेच्या वस्तू व सेवा देखिल या लोकांना मिळू शकत नाही. अशा प्रकारचे अत्यंत दुःखी जीवन दारिद्र्य अवस्थेत हे लोक वर्षानुवर्ष जगत आहेत.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील शासनाची भूमिका :**

ग्रामीण विकास हा लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा पुढाकार या पद्धतीने करावा लागेल. पंचायतीराज संस्थांना विकासाच्या दृष्टीने जास्तीत जास्त निधी, अधिकार व जबाबदारी द्यावी. लागेल राज्य शासनाची भूमिका ही साहाय्यकर्त्याची व सलागाराची व्हावी लागेल. Fund function and Functionary (निधी, कार्य, आणि मनुष्यबळ) हे संपूर्णपणे पंचायतराज व्यसवस्थेच्या आधीन ठेवावे लागतील. मुक्त निधी मोठ्याप्रमाणावर मिळाला तर लोकांनी लोकांची लोकांसाठी राबविलेल्या विकासप्रणालीच्या माध्यमातून शाश्वत ग्रामीण विकास होऊ शकेल.

महाराष्ट्रांच्या ग्रामविकास व पंचायतीराज विभागाची समृद्ध ग्राम संपन्न ग्रामस्थ ही संकल्पना जेव्हा सत्यात येईल तेव्हा परिपूर्ण ग्राम विकास असे म्हणता येईल. ही संकल्पना मूर्त स्वरूपात येण्यासाठी ग्रामीण भागात उच्च दर्जाच्या भौतिक सुविधांची निर्मिती व व्यवस्थापन मूलभूत सामाजिक गरजांची पूर्तता आणि उपजिविकेच्या सुयोग्य व पर्याय सुविधांची उपलब्धता या तीन मुलाखत घटकांकडे लक्ष पुरविणे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे भौतिक सुविधांमध्ये रस्ते विकास, जलपुरवठा स्वच्छता, ऊर्जा अशा सामूहिक तर गृहनिर्माण मुलभूत सामाजिक गरजांमध्ये शिक्षण, आरोग्य, पोषण, सामाजिक सुरक्षा या बाबींचा तर उपजिविकेचा संधीमध्ये स्वंयरोजगार व वेतनी रोजगारे यांचा समावेश होतो. ग्रामविकासाचे हे घटक परस्परांशी निगडीत आहेत. यातूनच ग्रामीण भागातील स्थानिकांना रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

राज्यशासनाची भूमिका ही दात्याची अथवा मालकाची न राहता ती सहाय्यक कर्त्याची असणे महत्त्वाचे ठरते. विकास करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची आणि सहकार्य राज्य शासनाचे अथवा अशा तऱ्हेची भूमिका रूजली गेली. आणि महाराष्ट्र शासनाने यादृष्टीने महत्त्वाची पावले उचलून गावातील नैसर्गिक संसाधनांवर ग्रामसभेचा अंकुश सामाजिक लेखा परिक्षण लघुवनोपजक व लघुखनिज यावर ग्रामसभेचे नियत्रण वैयक्तीकलाभार्थ्यांची निवड, ग्रामसभेत स्त्रियांना ५० टक्के आरक्षण यासारख्या अनेक तरतुदी अंतर्भूत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील स्थानिक गरजांचा विचार व विकास प्राधन्यक्रम ठरवून त्यांचे नियोजन ग्रामस्तरावर करावे लागते. आणि आवश्यक निधीचे वितरण ग्रामस्तरावरच होऊन अंमलबजावणी ही महत्त्वाची ठरली गेली. जिल्हा परिषदांची भूमिका ही साहाय्यकर्त्यांची व वेळप्रसंगी निरक्षकांची देखिल असावी.

देशाची प्रगती ही पायाभूत सुविधावरून अवलंबून असते. ग्रामीण अर्थव्यवस्था या पायाभूत सुविधा प्राप्त करून देण्यासाठी केंद्र सरकार व घटकराज्य सरकार सतत प्रयत्नशील आहेत. अर्थव्यवस्थेतील सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी वस्तूस्थिती आणि आर्थिक विकासामध्ये पायाभूत सुविधांची असणारी महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन शासनाने १९९० पासून उदारीकरणाचे धोरण स्वीकारले आहेत. ग्रामीण अर्थव्यवथ्येतील विकास घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र राज्याने पायाभूत सुविधा प्राप्त करून देण्यासाठी देशपातळीवर नावलौकीक मिळविला आहे. भौतिक पायाभूत सुविधांमध्ये ढोबळमानाने ऊर्जा, रेल्वे वाहतूक आणि दळणवळण आर्थिक वृद्धी टिकवून ठेवण्यासाठी भौतिक पायाभूत सुविधांची महत्त्वाची भूमिका बजावतात. परंपरागतपणे भौतिक पायाभूत सुविधांसाठी निधीचा पुरवठा मुख्य ते सार्वजनिक क्षेत्राकडून केला जातो. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने खेड्यांचा विकास हा आपल्या विकासाचा तसेच अर्थव्यवस्थेचा पाया समजला जातो या विकासासाठी शासन प्रत्येक बाजूने विचार करून हा पाया मजबूत करण्यासाठी पंचवार्षीक योजना हाती घेतल्यास तसेच खेडे पातळीवर, तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवर अनुक्रमे ग्रामंपचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषद,या लोकप्रतिनिधीच्या संघटना आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी ग्रामसेवक या प्रशासकीय व्यवस्था आहेत.

**निष्कर्ष:**

१. ग्रामीण भागात आधारभूत संरचना व मूलभूत सोयीची कमतरता आढळते.
२. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात दारिद्रयाचे दृष्टचक्र आढळते.
३. ग्रामीण भागातील लोकांच्या अज्ञानाचा, असहाय्यतेचा, गैरसोयीचा व अगतिकतेचा स्वत ः च्या फायद्याकरीता वापर करण्यात येऊन त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण करण्यात येते.
४. ग्रामीण भागात ऋणग्रस्तता हा एक व्यापक प्रश्न आहे.
५. ग्रामीण भागात अनारोग्याची समस्या भेडसावते.
६. ग्रामीण भागात आर्थिक शिस्त आणि व्यावसायिक दृष्टीकोनाचा अभाव
७. ग्रामीण भागात अन्नधान्य उत्पादनाच्या समस्या भेडसावतात.

**शिफारशी :**

१. महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील आधारभूत संरचना व मूलभूत सोयीकरिता विशेष तरतूद केली पाहिजे.
२. ग्रामीण भागातील दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने दुय्यम उद्योग धंद्यासाठी कर्जवाटप केले पाहिजे. महिलांना गृहउद्योगासाठी विशेष सवलती द्याव्यात.
३. ग्रामीण भागातील नागरीकांसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करून त्याकडे लक्ष देण्याकरिता एका विशेष अधिकाराची निवड केली पाहिजे.
४. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यासाठी विशेष आरोग्याकेंद्रांची सोय महाराष्ट्र शासनाने केली पाहिजे.
५. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी व्यावसायिक शिक्षणाची सोय महाराष्ट्र शासनाने केली पाहिजे.
६. ग्रामीण भागात अन्नधान्य सुरक्षिततेची विशेष सोय महाराष्ट्र शासनाने करावी

**संदर्भ सुची :**

१. डोळे बा.म. कुलकर्णी (२००७) ग्रामीण विकासासंबंधी बिन सरकारी सेवाभावी संख्यांचा दृष्टीकोन मुक्त एंटरप्रायजेस नाशिक, पृष्ठ क्र. ३०
२. काळे वा. सी. डोईफोडे अ. की, राजदेरकर उमेश (२००७)ग्रामीण भारताच्या समस्या प्रथम आवृत्ती मुक्ता एंटरप्रायजेस नाशिक पृष्ठ क्र २
३. Pareek Vida (1982) " Education and Rural Development in Asia, oxford and IBH publication, company, Bombay page No.4
४. नामदे ना.भा. राजहेरकर उमेश (२००७) ग्रामीण सरकारी संघटना आणि विकासासंबंधी सरकारी दृष्टीकोन प्रथम आवृत्ती मुक्ता इंटरप्रायजेस पृष्ठ क्र.४१
५. कविमंडन विजय. (२०१२) कृषी आणि ग्रामीण अर्थशास्त्र सहावी आवृत्ती, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र ४१८.
६. कराळे गंगाधर (२००६) ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन प्रथम आवृत्ती श्रीमंगेश प्रकाशन नागपूर प्र क्र. ५४
७. पवार एन एस (१९९९) आपल गाव आपलंच सरकार प्रथम आवृत्ती वनराई विकास प्रकाशन, यवतमाळ पान क्र. २९
८. पुर्वोक्त पृ. क्र. २२
९. देसाई स. श्री. मु. भालेराव निर्मल (२०११) भारतीय अर्थव्यववस्था आठवी आवृत्ती, निराली प्रकाशन, पुणे क्र. ८.१
१०. www.planning commssion. gov.in
११. www.rural.nic.in
१२. www.mahanews.gov.in
१३. www.dradanashik.com